3. सदर निधी प्रमाणकांच्या आणि प्रदानांच्या (Out Come) आधारे दिला जाईल,

4. राज्यातील संस्थांची सर्वंकष गुणवत्ता वाढविणे,

5. राज्य विद्यापीठांची स्वायत्तता वाढविणे आणि संस्थांमधील प्रशासनिक सुधारणा करणे.

6. संलग्नता, शैक्षणिक आणि परीक्षाप्रणाली सुधारणा करणे.

7.सर्व उच्च शैक्षणिक संस्थांमधील उच्च दर्जाच्या विद्याशाखा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतील याची खात्री देणे तसेच सर्व स्तरांतील रोजगारांची क्षमता वर्धन करणे.

8. उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये संशोधन व नवोन्मेषासाठी .वातावरणनिर्मिती करणे,

## एकात्मिक बालविकास प्रकल्प

सुरुवात : 2 ऑक्टोबर, 1975

बालविकासासाठी राबविण्यात येणारी ही जगातील सर्वांत मोठी योजना आहे.

या योजनेचे लाभार्थी : 6 वर्षांखालील बालके, गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता हे आहेत.

योजनेची उद्दिष्टे :

- 0 ते 6 वयोगटातील मुलांचे पोषण आणि आरोग्य स्थिती सुधारणे.
- मुलांच्या योग्य मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासासाठी पाया घालणे.
- मृत्युदर, विकृती, कुपोषण आणि शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करणे.
- मुलांच्या विकासास चालना देण्यासाठी विविध विभागांमधील धोरणे आणि अंमलबजावणीचा प्रभावी समन्वय साध्य करणे.
- योग्य पोषण आणि आरोग्य शिक्षणाद्वारे मुलांच्या सामान्य आरोग्य आणि पौष्टिक गरजा पूर्ण करण्यासाठी मातांची क्षमता वाढविणे.

सेवांचा संच : खालील 6 सेवा या योजनेंतर्गत उपलब्ध करून देण्यात येतात.

(1) पूरक पोषण आहार : बालके, स्तनदा माता, गर्भवती स्त्रिया यांच्या पोषणविषयक किमान गरजा पुरविण्यासाठी पूरक पोषण आहार कार्यक्रम राबविण्यात येतो. यानुसार एका वर्षातून किमान 300 दिवस पूरक पोषण आहार देण्यात येतो.

(2) आरोग्य तपासणी : यामध्ये 6 वर्षांपेक्षा कमी वयाची बालके, स्तनदा माता, गर्भवती स्त्रिया यांची नियमित आरोग्य तपासणी, वजन, प्रतिरक्षण, कुपोषण व्यवस्थापन, डायरिया (अतिसार उपचार) औषधांचे वितरण इत्यादी सेवा पुरविण्यात येतात.

(3) संदर्भित सेवा : आरोग्य तपासणी, वाढीचा आढावा, तत्काळ वैद्यकीय मदतीची गरज असलेल्या आजारी किंवा कुपोषित बालकांना आरोग्य केंद्राकडे संदर्भित करणे. या सर्व प्रकारची यादी अंगणवाडी सेविका रजिस्टरमध्ये नोंदवून घेतात.

(4) शालेयपूर्व अनौपचारिक शिक्षण: या योजनेंतर्गत अंगण- वाडीमध्ये 3 ते 6 वर्षांच्या बालकांना शालेयपूर्व अनौपचारिक शिक्षण देण्यात येते.

(5) पोषण आणि आरोग्य शिक्षण: पोषण, आरोग्य शिक्षण हे अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे एक प्रमुख अंग आहे. विशेषतः 15 ते 45 वयादरम्यानच्या स्त्रियांच्या दीर्घकालीन क्षमता विकासावर भर देण्यात येतो. जेणेकरून त्यांच्या स्वत:च्या आरोग्याची पोषण व विकासाची गरज तसेच त्यांच्या मुलांची आणि कुटुंबाची काळजी घेऊ शकतील.

(6) लसीकरण: यामध्ये गर्भवती महिला, नवजात बालक यांना टाळता येण्याजोग्या रोगांविरुद्ध लसीकरण करण्यात येते. पोलिओ,

लोकसंख्या निकष :

शहरातील प्रकल्पासाठी 1 लाख लोकसंख्येसाठी एक शहरी
ICDS प्रकल्प मंजूर केला जातो.
ग्रामीण भागामध्ये वस्त्यांच्या लोकसंख्येनुसार अंगणवाडी केंद्रे
स्थापन करण्यात येतात.

## झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

उद्देश :

1. मदरसांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपरिक धार्मिक शिक्षणाबरोबर विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी
व उर्दू या विषयांचे शिक्षण देणे.

2. मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इयत्ता 9 वी, 10 वी, 11 वी व 12 वी यांतील आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे. जेणेकरून त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत व रोजगार क्षमतेत वाढ होऊन त्यांचा आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत होईल या दृष्टीने मदरसांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सुविधा, ग्रंथालयासाठी अनुदान देणे, शिक्षकांच्या मानधनासाठी अनुदान देणे.